بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُهٗ وَنُصَلِّی عَلٰی رَسُوۡلِهِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِهِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰهِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

## हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे

## لا الہ الا اللہ चे गूढार्थ स्पष्टीकरण

## जगाच्या सर्वसामान्य शांतता आणि सौहार्दासाठी प्रार्थनेचे उपदेश

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १४ अप्रैल २०२३, मशिद मुबारक, यु.के.

أَشۡهَدُ أَنۡ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِیۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّیۡطٰنِ الرَّجِیۡمِ۔

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِیۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ مٰلِكِ یَوۡمِ الدِّیۡنِ۔ اِیَّاكَ نَعۡبُدُ وَاِیَّاكَ نَسۡتَعِیۡنُ۔ اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِیۡمَ۔ صِرَاطَ الَّذِیۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَیۡهِمۡ ۙ۬ غَیۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَیۡهِمۡ وَلَا الضَّآلِّیۡنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणाले,

لا الہ الا اللہ (ला इलाहा इल्लल्लाह) हा तो कलमा (शब्द) आहे जो एकेश्वरवादाची मूलभूत रचना आहे. पवित्र पैगंबर (स.) म्हणाले की अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी जो कोणी لا الہ الا اللہ उच्चारतो अशा व्यक्तीवर अल्लाहने नरकाग्नी हराम केली आहे. म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती अल्लाहची प्रसन्नता मिळवण्यासाठी अल्लाहकडे लक्ष टेकवून لا الہ الا اللہ म्हणते, तेव्हा तो अल्लाहच्या आशीर्वादांचा वारस बनतो.

पवित्र प्रेषित (स.) यांनी म्हटल्याप्रमाणे: ''अल्लाह नरकाग्नी त्याच्यावर निषिद्ध करेल?'' हीच शिकवण होती जी सर्व संदेष्ट्यांनी आणली. पवित्र पैगंबर (स.) म्हणाले की, لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِیۡكَ لَهٗ (परमेश्वराशिवाय कोणीही उपासनेसाठी योग्य नाही, एकमेव आहे त्याचा कोणीही भागीदार नाही.) हाच सर्वोत्तम कलमा मी आणि माझ्या पूर्वीच्या सर्व प्रेषितांनी उच्चारले होते. पण दुर्दैवाने प्रेषितांच्या अनुयायींनी या संदेशाचे प्रत्यक्ष स्वरूप विसरून अनेकेश्वरवादामध्ये गुरफटलेले गेले. सौभाग्याने परमेश्वराने आम्हाला पवित्र पैगंबरांच्या अनुयायींमध्ये सामील करून ती परिपूर्ण शिकवण प्रदान केली ज्याने बहुदेववादाला समाप्त केले. आणि पवित्र पैगंबर स. यांनी

एकेश्वरवादाचा खऱ्या आणि गूढ अर्थ समजावून आम्हाला दोन्ही लोकात सुरक्षित केले. आता जो पैगंबरांच्या शिकवणींवर अंमल करत असेल आणि जो प्रामाणिकपणे अल्लाहच्या एकत्वाची कबुली देईल, तो अल्लाहच्या आशीर्वादाचा वारस ठरेल आणि जो पैगंबरांच्या मध्यस्थतीचा लाभ घेईल.

पैगंबरांच्या मध्यस्थतीचा लाभ घेण्यासाठी शुद्ध मनाने आणि भौतिकतेच्या पलीकडे ला इलाहा इल्लल्लाह ला कबूल करणे आवश्यक आहे. पवित्र पैगंबर ते सर्वश्रेष्ठ आणि शेवटचे प्रेषित आहेत ज्यांना मध्यस्थी करण्याचा अधिकार प्राप्त आहे. आणि त्यांच्याकडून तो लाभ उचलण्याकरिता त्यांच्यावर विश्वास असणे अपरिहार्य आहे.

सुदैवाने परमेश्वराने आम्हाला अर्थात अहमदी लोकांना या युगाच्या अवताराला आणि पवित्र पैगंबराच्या खऱ्या दासाला स्वीकारण्याचे सौभाग्य प्रदान केले आहे; ज्यांनी इस्लामी शिकवणूकींना स्पष्टपणे आमच्यासमोर प्रस्तूत केले. जिथे त्यांनी ला इलाहा इल्लल्लाह बद्दल आम्हाला सांगितले तिथेच प्रेषितांच्या मार्तबाबद्दलही आम्हाला अवगत केले. या संदर्भात, मी अपेक्षित मसीह यांचे काहीं उदधृत प्रस्तूत करेन जे या विषयाला स्पष्ट करते आणि याकडे लक्ष देऊन आत्मनिरीक्षण करण्यास प्रतिबद्ध करते.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की परमेश्वराने اَلْيَوْمَ اَكْمَلْتُ चे स्पष्टीकरण स्वतः प्रस्तूत केले. यामध्ये तीन चिन्हांचे होणे अत्यावश्यक आहेत. पहिला اَصْلُهَا ثَابِتٌ अर्थात ज्याचा पाया जड आणि मजबूत आहे. दुसरा فَرْعُهَا فِى السَّمَآءِ त्याची शाखां आकाशात वावरत आहेत? तिसरा चिन्ह म्हणजे, تُؤْتِىْ اُكُلَهَا كُلَّ حِيْنٍ ते प्रत्येक वेळी ताजे फळ देते. ते म्हणाले की, इस्लाम हा एकमेव असा धर्म आहे जो या चाचणीवर खरा उतरतो. ते पुढे म्हणाले की, विश्वासाच्या तत्त्वांचे पहिले लक्षण म्हणजे कलमा ला इलाहा इल्लल्लाह आहे ज्याला अशा विपुल प्रमाणात कुरआन मध्ये संकलित केले गेले की ज्याचे तमाम युक्तीवाद काहीं भागांत संपन्न होऊ शकत नाही. परमेश्वराचे सर्व निर्मिती आणि निसर्ग नियम स्पष्टपणे दर्शवत आहे की या जगाचा एक निर्माता आहे ज्याच्यासाठी आवश्यक आहे की तो कृपाळू, दयाळू, सर्वशक्तिमान, एकम् अद्वतम्, अनादि आणि सशक्त असावा. आणि सर्व गुणवैशिष्टांचा स्वामी आणि ईशवाणी करणारा असावा. म्हणून ला इलाहा इल्लल्लाह  हे फक्त एक निर्माताचा विचार मनात निर्माण करत नाही तर या गोष्टीचाही विश्वास उत्पन्न करतो की आमचा विधाता अनादि आणि अनंत आहे. तो प्रत्येक निर्मितीचा निर्माता आणि आणि सर्व विनवणीना पूर्ण करणारा आहे. जेव्हा श्रद्धेची पातळी इतपर्यंत पोहोचेल तेव्हा ती परिपूर्ण मानली जाईल, ज्यामध्ये कणमात्रही बहुदेववाद दिसत नाही. आणि याच दृढ विश्वासाबद्दल पवित्र पैगंबरांनी असे सांगितले होते की, जो प्रामाणिक होऊन ला इलाहा इल्लल्लाह  उच्चारतो आणि त्यावर ठाम विश्वास बाळगतो त्याच्यावर नरकाग्नी हराम आहे.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, अल्लाह हाच केवळ तो परिपूर्ण अस्तित्व आहे ज्याच्याकडून मदत मागणे योग्य आहे आणि इतर कोणालाही हा अधिकार प्राप्त नाही. पवित्र कुरआनने या गोष्टीवर भर दिलेला आहे. जसे की नमूद आहे, आम्ही तुझीच उपासना करतो आणि तुझ्याकडूनच सहाय्यची याचना करतो, याद्वारे हे सिद्ध होते की याचना करण्याचा अस्सल हक्क सर्वशक्तिमान अल्लाहला प्राप्त आहे. यानंतर हा हक्क अल्लाहचे मित्र आणि श्रद्धावंतांना प्रदान करण्यात आले आहे, ज्यांच्या प्रार्थनाद्वारे सहाय्यता प्राप्त होते. अपेक्षित मसीह म्हणाले, ''आपण आपल्या तर्फे कोणतीही रचना करू नये तर अल्लाह आणि पवित्र पैगंबराची उक्तीच्या अधीन राहावे. याचाच नाव सरळ मार्ग आहे आणि ही गोष्टी ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलूल्लाह पासून अगदी स्पष्ट होते. ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलूल्लाह च्या पहिल्या भागापासून बोध होतो की मनुष्याचा प्रेम आणि उद्देश केवळ अल्लाह असणे आवश्क आहे. आणि दुसऱ्या भागाद्वारे पवित्र पैगंबर यांच्या प्रेषितत्वाची हकीगत अभिव्यक्त होणे आवश्यक आहे.

हजरत अपेक्षित मसीह म्हणतात की, ला इलाहा इल्लल्लाह चा हक्क तोपर्यंत अदा होत नाही जोपर्यंत ती व्यक्ति आपल्या कृतींद्वारे हे सिद्ध करत नाही आणि विश्वासाची हीच अट आहे. निर्माता आणि निर्मिती दोघांचे हक्क अदा करणे जरूरी आहे तेव्हाच तो ला इलाहा इल्लल्लाह वर अंमलबजावणी करणारा सिद्ध होतो आणि असा मनुष्य परमेश्वरासमीप लबाड ठरत नाही.

या कलमा चा दुसरा भाग आदर्शरित्या आहे. जगात प्रेषित आणि दूत आदर्श म्हणून अवतरतात आणि पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) हे सर्वोत्कृष्ट प्रेषित होते ज्यांमध्ये तमाम प्रेषितांचे आदर्श जमा होते. परमेश्वराच्या आदेशांवर पूर्ण अंमल आणि उचित भाष्य व स्पष्टकरण त्यांनी करून दिली आणि दाखवली.

अपेक्षित मसीह (अ.स.), आपल्या अनुयायांना उपदेश करतात की, दीक्षा औपचारिक लाभ देत नाही. त्याचा लाभ तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा प्रामाणिक होऊन त्याचे अधीन होऊन जावे ज्याला स्वीकार करून दीक्षा घेतली गेली आहे. शक्य असेल तितका रंग आपल्या गुरूचा अंगीकारावा आणि संध्या व सकाळ हे निरीक्षण करावे की ला इलाहा इल्लल्लाह वर कितपत अंमल केले गेले. माझा हा उद्देश नाही की मुसलमान रात्रंदिवस फक्त कलमा उच्चारत बसावे तर आपले काम आणि व्यवसाय करताना परमेश्वराचा जो हक्क आहे तो पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. व्यवसायातही परमेश्वराचे प्रेम व भीती बाळगणे गरजेचे आहे. प्रत्येक बाबतीत धर्माला प्राधान्य द्या. ऐहिक जीवन तुमच्या जीवनाचा उद्देश नासावा. जर धर्म हेच मुख्य ध्येय असेल, तर सांसारिक व्यवहारही धर्मच असतील. सोबतींनी अडचणीच्या वेळी परमेश्वराला सोडले नाही, ईश्वराकडे दुर्लक्ष केले नाही, नमाज सोडली नाही, उलट त्यांनी प्रार्थनाद्वारे स्वतःला बलवान केले.

अपेक्षित मसीह (अ.स.) कलमा ची हकीगत, त्याचे गूदार्थ आणि त्यावर अंमल करण्यासंदर्भात सांगतात, ''विश्वास म्हणजे आचरणात त्या गोष्टी प्रकट करणे ज्याच्या आज्ञांमध्ये (पवित्र कुरआन मध्ये) सांगितले आहे. नंतर प्रत्यक्षात, धर्माला प्रत्येक बाबींवर प्राधान्य देणे. म्हणून ज्याने खऱ्या मनाने ला इलाहा इल्लल्लाह ला कबूल केले तो निश्चितच स्वर्ग प्राप्त करेल. व्यवहारात धर्माने परिपूर्ण असणे. मग तो अल्लाहशिवाय कोणावरही प्रेम करू शकत नाही, आणि तो फक्त अल्लाहचा आनंद शोधतो, आणि त्रासाने तो त्रस्त होत नाही, कारण त्याला खात्री असते की अल्लाह आपल्या जिवलग मित्राच्या मदतीला त्वरित पोहोचतो आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.), जो पर्यंत अल्लाह आणि त्याच्या निर्मिकांचे हक्क अदा करत नाहीत तो पर्यंत ला इलाहा इल्लल्लाह चे उद्देश साध्य करू शकत नाहीत. एक भाऊ दुसऱ्या भाऊ चा हक्क अदा करत नाही किंबहुना दमन करतो आणि भौतिकतेवर पूर्ण भरवसा बाळगतात आणि परमेश्वर एक निर्जीव व निलंबित अवयव जाणतात. एकेश्वरवादाची संकल्पना समजून घेणारे फार कमी लोक आहेत. कलमा ची सत्यता जाणीव करून घेऊन त्याचा व्यवहारात वापर केल्यास तो खूप प्रगती करू शकतो, आणि सर्वशक्तिमान अल्लाहच्या अनन्यसाधारण आणि विलक्षित शक्तींचे निरीक्षण करू शकतो. खरा श्रद्धावंत तेव्हाच होतो जेव्हा तो सर्व प्रकारच्या दुष्कृत्यांपासून परावृत्त होतो. म्हणून रमजानमध्ये प्रत्येकाने स्वतःला या दुष्कृत्यांपासून शुद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रमजान च्या या उर्वरित दिवसांत आम्ही प्रयत्न आणि प्रार्थनांद्वारे बदल घडवून आण्याचे प्रयत्न करू. अल्लाह आम्हाला याचे सामर्थ्य देवो.

रमजानच्या शेवटच्या दहा दिवसात, आम्ही साधारणपणे लैलतुल-कद्रबद्दल बोलत असतो. लैलतुल-कदर हा खऱ्या अर्थाने तेव्हा प्राप्त होते जेव्हा आपण अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्यास तयार असतो, आणि त्या आदेशांना जीवनात शाश्वत स्वरूपात अंगीकारण्याची प्रतिज्ञा करतो. हेच खरे लक्षण आहे लैलतुल कदर प्राप्त करण्याचे. मुख्य लक्षण म्हणजे आपल्या अंतःकरणात काय क्रांती झाली.

आपण शुद्ध राहून तीन दिवस प्रार्थना केली तर अल्लाहची विशेष कृपा दिसून येऊ शकते, हे समोर ठेवून काही जमाअतने विशेष प्रार्थना कार्यक्रमही तयार केले आहे. जर आपण हे तीन दिवस विशेषत: या कारणासाठी नियुक्त केले असतील आणि मग परत आपल्या जुन्या जीवनात परत जाण्याची इच्छा असेल आणि ला इलाहा इल्लल्लाह च्या अस्सल उद्देशाला विसरण्याची तयारी असेल तर लक्षात ठेवा की परमेश्वर आमच्या अंतःकरणाला भरपूर जाणतो आणि आमच्या ध्येयांना समजतो त्याच्यापासून काहीच गुप्त नाही. अशा परिस्थितीत हे तीन दिवस तुम्हाला काहीच लाभ देणार नाहीत परंतु जर अल्लाहची मर्जी संपादन करण्याच्या उद्देशाने हे दिवस व्यतित करायचे असेल तर मग हे प्रण घ्या की या दिवसात केली जाणारी प्रार्थना आणि तपस्या आमच्या जीवनाची शैली होऊन जावे. तेव्हाच अल्लाह आमच्या विरोधीं विरूद्ध आम्हाला सहाय्यता आणि आशीर्वाद प्रदान करेल. इन्शाल्लाह.

अल्लाहने हजरत अपेक्षित मसीह यांना वादा केलेला आहे की त्यांना आणि त्यांच्या अनुयांयाना विजय प्राप्त होईल. लवकर किंवा काहीं काळानंतर.जर ला इलाहा इल्लल्लाह ची हकीगत जाणून आपला विधाता, ध्येय आणि प्रेम फक्त अल्लाह म्हणून कबूल करत असेल आणि त्याला प्राप्त करणेच आमचा उद्देश असेल तर परमेश्वराकडून क्रांती जलद गतीने येण्याचा अंदाज आहे. त्यासाठी आम्हाला आमच्या परिस्थितीमध्ये कायमस्वरूपी परिवर्तन घडवण्याचे प्रण घेणे आवश्यक आहे.

सरतेशेवटी, हुजूर अन्वर म्हणाले की, या दिवसांत जगात शांतता आणि स्थैर्यासाठी प्रार्थना करत राहा. सर्वशक्तिमान अल्लाह मानवतेवर दया आणि कृपा करो आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔